जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (महसुल शाखा)-४११००१
E-mailil Id-mahsulpune१@gmail.com Ph. No. ०२०-२६११४८०४

क्र.मुळशी/एनए/एसआर/५९/२०१९
पुणे-१ दिनांक:२५/१०/२०१९

प्रति,
तहसिलदार मुळशी,
ता. मुळशी, जि.पुणे

विषय:- जमिन अकृषिक झाल्याची नोंद संबंधित जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ सदरी घेणेबाबत.
मौजे हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे येथील जमीन ग.नं/स.नं. २६३/१/४, २६४/१अ/२, २६४/१ब/२, २६४/२अ व २६४/२/ब मधील १७२५२.०० चौ.मी. क्षेत्र वाणिज्य प्रयोजनार्थ अकृषिक झाल्याची नोंद घेणेबाबत...

संदर्भ:-१) अर्जदार मे. विनोदे वाकडकर इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे भागीदार श्री. विशाल यशवंत वाकडकर व इतर, रा. स्पीरीया, स.नं. ९१/४, हिंजवडी, मारूंजी फेज रोड, विनोदेनगर, वाकड, पुणे-५७ यांचा दिनांक -१०/१०/२०१९ रोजीचा अर्ज.
२) महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचेकडील दि.०५/०१/२०१७ रोजीची अधिसुचना
३) शासन परिपत्रक क्र.एनए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१ दिनांक. १९ ऑगस्ट २०१७

उपरोक्त नमुद विषयान्वये, शासन परिपत्रक दिनांक-१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे, **मौजे हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे येथील जमीन ग.नं/स.नं. २६३/१/४, २६४/१अ/२, २६४/१ब/२, २६४/२अ व २६४/२/ब मधील १७२५२.०० चौ.मी. क्षेत्र वाणिज्य** प्रयोजनासाठी जमिन अकृषिक झाल्याची नोंद संबंधित जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ सदरी घेणेबाबत अर्जदार मे. विनोदे वाकडकर इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे भागीदार श्री. विशाल यशवंत वाकडकर व इतर, रा. स्पीरीया, स.नं. ९१/४, हिंजवडी, मारूंजी फेज रोड, विनोदेनगर, वाकड, पुणे-५७ यांनी या कार्यालयाकडे दिनांक-१०/१०/२०१९ रोजी या कार्यालयाकडे अर्ज करून विनंती केलेली आहे.

२. अर्जदार यांनी विनंती केलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं./गट नं. | प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|
| १ | चंद्रकांत दत्तोबा टकले<br>शिला दत्तोबा टकले<br>जयश्री अंकुशराव थोरवे<br>इंदूबाई दत्तोबा टकले<br>माहेश्वरी रविंद्र टकले<br>मंदा रविंद्र टकले<br>रोहन रविंद्र टकले<br>रोहित रविंद्र टकले<br>जितेंद्र महेंद्र टकले<br>वर्षा महेंद्र टकले<br>नरेंद्र महेंद्र टकले | २६३/१/४ | २३५२.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | बळवंत नाथु विनोदे<br>संपत बळवंत विनोदे | २६४/१अ/२ | ३४५०.०० |
| ३ | बळवंत नाथु विनोदे<br>नितिन बळवंत विनोदे | २६४/१ब/२ | ३४५०.०० |
| ४ | यशवंत हिरामण विनोदे | २६४/२अ | ४०००.०० |
| ५ | सुदाम हिरामण विनोदे | २६४/२ब | ४०००.०० |
| एकूण क्षेत्र | | | १७२५२.००.०० |
| रेखांकन/बाधकाम नकाशामध्ये समाविष्ठ केलेले क्षेत्र | | | १७२५२.०० |
| अकृषिक सारा आकारणीचे प्रयोजन | | | वाणिज्य |

३. प्रकरणी या कार्यालयाकडील पत्र क्र. मुळशी/एनए/एसआर/५९/२०१९, दिनांक-०१/१०/२०१९ अन्वये खालीलप्रमाणे अकृषिक सारा, रूपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा करणेबाबत अर्जदार यं ाना कळविणेत आलेले होते.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | बिगरशेती आकारणीचे प्रयोजन | रहिवास |
| २ | बिगरशेती आकारणी क्षेत्र (चौ.मी.) | १७२५२.०० |
| ३ | बिनशेती आकारणीचा दर (प्रति चौ.मी.) | ०.१० |
| ४ | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी | १७२५.०० |
| ५ | रुपांतरीत कराची आकारणी | ८६२५.०० |
| ६ | जिल्हा परिषद कर | १२०७५.०० |
| ७ | ग्रामपंचायत कर | १७२५.०० |
| वसूल करावयाची एकूण रक्कम रुपये | | २४१५०.०० |

त्यानुसार वरीलप्रमाणे नमुद अकृषिक सारा, रूपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा केलेबाबत अर्जदार यांनी चलन क्र. MH००७००४५४१२०१९२०M, दिनांक- ०४/१०/२०१९ व डिफेस चलन क्रमांक ०००३६५२२७४२०१९२० दि. ०५/१०/२०१९ या कार्यालयास सादर केले आहे.

तसेच विषयांकीत मिळकतीवरील रेखांकन/बांधकाम नकाशास पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी त्यांचेकडील **पत्र क्र. बीएमयु/मौ. हिंजवडी/ग.नं. २६३पै व २६४पै/प्र.क्र.४३८/१८-१९, दिनांक-१३/०९/२०१९** अन्वये दिलेल्या प्रारंभ प्रमाणपत्राची व बांधकाम नकाशाची प्रत सादर केलेली आहे.

सबब, आपणास या पत्रान्वये कळविणेत येते की, शासन परिपत्रक दिनांक-१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे विषयांकीत नमुद मिळकत **अकृषिक झालेबाबतची नोंद** नमुद मिळकतीचे ७/१२ सदरी घेण्याकामी फेरफार घेण्यासंदर्भात कार्यवाही करण्यास तसेच त्यानुसार **गाव नमुना नं. २** अद्यावत करून दुरुस्त अधिकार अभिलेखाची प्रत व फेरफार अर्जदारास उपलब्ध करुन देणेबाबत संबंधित गांव कामगार तलाठी **हिंजवडी** यांना आपले स्तरावर कळविण्यात यावे. तसेच विषयांकीत मिळकत अकृषिक झालेबाबतची नोंद नमुद मिळकतीचे **७/१२** सदरी व **गाव नमुना नं. २** ला घेणेची कार्यवाही संबंधित गाव कामगार तलाठी यांचे स्तरावरून

झाली किंवा कसे? याची पडताळणी आपले स्तरावरुन करणेत येऊन तद्नंतर प्रस्तुतची नोंद **तालुका नमुना नं २** ला घेणेकामी योग्य ती कार्यवाही करावी.

सोबत:- आपले कार्यालयाचे अभिलेखात जतन करणेकामी मुळ संचिका **पान क्र. १ ते** ३७९ जोडली असे.

**मा. जिल्हाधिकारी सो.**
**यांचे मान्यतेने**

(विवेक जाधव)
**तहसिलदार महसुल**
**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे**

प्रत:-१) मे. विनोदे वाकडकर इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे भागीदार श्री. विशाल यशवंत वाकडकर व इतर, रा. स्पीरीया, स.नं. ९१/४, हिंजवडी, मारुंजी फेज रोड, विनोदेनगर, वाकड, पुणे-५७

२) **मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,** पुणे महानगर प्रदेश विकास क्षेत्र प्राधिकरण, सयाजीराव गायकवाड, उद्योग भवन औंध पुणे-०७

३) **गाव कामगार तलाठी मौजे हिंजवडी,** ता. मुळशी, जि. पुणे

४) **राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र** जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११ ००१ यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना. (N-I-C)

(विवेक जाधव)
**तहसिलदार महसुल**
**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे**